महापारेषण

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
कामगार, औद्योगिक संबंध व कर्मचारी कल्याण विभाग,
प्रकाशगंगा प्लॉट सी-१९, ई-ब्लॉक ४ था मजला, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०००५१
Email : ciro@mahatransco.in website : www. mahatransco.in दुरध्वनी क्र.. २६५९५०४३ / २६५९५०६४
C.I.N.No. U40109MH2005SGC153646

जा.क्र.महापारेषण/मास/का.औ.स.क.वि/ ०१५०३ दि.०५.०३.२०१९.

प्रति,

मा.कामगार उप आयुक्त (औसं),
महाराष्ट्र शासन,
कामगार भवन, बांद्रा — कुर्ला संकुल,
बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

**विषय** : महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या मागण्याबाबत....

**संदर्भ** : १. MVKKSANGH/MSETCL/2018/090A, Dated 13.12.2018.
२. औसं/समेट प्रकरण/१६(०३)२०१८/कार्या-७/९५८, दि.०८.०१.२०१९.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण यांना अग्रेषित केलेले वरील संदर्भिय पत्र क्र. १ या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. तसेच सदर संघाने सदरचे प्रकरण हे समझोत्यासाठी आपणाकडे सादर केलेले आहे. त्या अनुषंगाने संपन्न होत असलेल्या चर्चेसाठी महापारेषण कंपनीचा अभिप्राय खालील प्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितमध्ये सर्व साधारणपणे आजमितीस १५७९ व्यक्ती बाहयस्त्रोताच्या माध्यमातून काम करतात. महापारेषण कंपनीची यंत्रणा वीज पारेषण क्षेत्रामध्ये कार्यरत असल्यामुळे विविध उपकेंद्रे, ग्रहणकेंद्रे यांच्या माध्यमातुन वीज पारेषणाचे काम करीत आहेत. ही यंत्रणा प्रभावी करण्यासाठी संचलन व सुव्यवस्था करीत असताना गरजेनुसार काही तात्पुरत्या स्वरुपाची, प्रासंगिक तत्वावरील कामे ही कंत्राटी पध्दतीने करुन घेणे गरजेचे बनते. अशावेळी निविदांच्या माध्यमातुन कंत्राटदार नेमण्यात येतात. ही कामे करण्याकरीता कंत्राटदारामार्फत नेमण्यात येणारे कामगार हे कंत्राटदाराच्या आस्थापनेवर काम करतात.

कंत्राटी कामगारांसाठी किमान वेतनाचे दर कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन यांचेकडून निर्गमित झाल्यानंतर कंपनी परिपत्रकाच्या माध्यामातुन सर्व क्षेत्रीय कार्यालयांपर्यंत हे दर अंमलबजावणीसाठी प्रसारित करते. त्याबाबतची काटेकोर अंमलबजावणी करण्याकरिता संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना या कार्यालयाचे पत्र क्र.महापारेषण/साकां/मासं/का.औ.सं.क.क.वि/१४२ दि.०३.०१.२०१४ अन्वये निर्देश दिलेले आहेत. त्याचबरोबर प्रत्येक वेळेस कंत्राटदार नेमताना कामगारांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन अदा केले जाण्याची अट तसेच भविष्य निर्वाह निधी, कामाार राज्य विमा, सुरक्षेची हमी, रजेचा पगार या अनुषांगिक सुविधा व लक्ष देण्याविषयीची अट संबंधीत कंत्राटाच्या कार्यादेशामध्ये अंतभुर्त करण्यात येते. त्या अटीचे पालन होत असल्याची खातरजमादेखील कंपनी वेळोवेळी करीत असते.

महापारेषण कंपनीच्या प्रचलीत सेवाभरती विनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही कंत्राटी कामगारांना थेट सामावून घेण्याची तरतुदत नाही. तथापि, ज्या ज्या वेळेस महापारेषण कंपनीची सरळ सेवा भरतीची जाहीरात प्रसिध्द होईल त्यावेळेस जाहीरातीतील सदर पदांचे निकष व पात्रतेच्या अधिन राहून सदर जाहिरातीस प्रतिसाद देवून अर्ज करु शकतात.

आपला विश्वासु
(भरत पाटील)
उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत सविनय सादर :

१. कार्यकारी संचालक (मासं), सांघिक कार्यालय, मुंबई.
२. मुख्य महाव्यवस्थापक (मासं), सांघिक कार्यालय, मुंबई.